जा.क्र.नावाशमनपा/नसका/सिआर-16/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
दिनांक :- 08.10.2021

## विशेष सर्वसाधारण सभेची सुचना

**महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूका घेणे (सुधारणा) नियम 2006 मधील नियम क्रमांक 3(1) अन्वये**

महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूका घेणे) (सुधारणा) नियमा 2006 मधील नियम क्रमांक 3(2) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करुन मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी ठरवुन दिल्या प्रमाणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक 13/10/2021 रोजी सकाळी 11.00 वाजता ONLINE द्वारे आयोजीत केली आहे.

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी ONLINE सभेस उपस्थित राहुन सहकार्य करावे.

टिप :- सभा सुरु होण्याच्या 15 मिनिट अगोदर Nagarsewak nwcmc ह्या व्होटसअप ग्रुपवर सभेत JOIN होण्यासाठी लिंक देण्यात येईल सदरच्या लिंकवर क्लीक करुन ह्या विशेष सभेत JOIN व्हावे ही विनंती.

( स. अजितपालसिंघ संधु )
नगरसचिव
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रति,
श्री / श्रीमती ................................................................
स. सदस्य / सदस्या,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

### विषय पत्रिका

विषय क्रं. 01

श्रीमती येवनकर मोहिनी विजय यांनी महापौर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असल्यामुळे रिक्त झालेल्या दुसऱ्या सत्राच्या उर्वरीत कालावधीसाठी महापौर या पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 19(5) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणूक घेणे ) नियम 2005 व ( सुधारणा ) नियम 2006 अन्वये निर्वाचीत सदस्या मधुन मा. महापौर यांची निवड करणे बाबत.

महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रमांक एमसीओ-2019/प्र.क्र.155/नवि-14 दिनांक 14 नोव्हेंबर 2019 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर पद हे नागरीकांचा मागास प्रवर्ग (महिला) करीता आरक्षित ठेवण्यात आलेले आहे.

टिप :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 19 (1ब) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थितीत, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौराच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, 2000 (2001 चा महा.23) यांच्या तरतुदींना अनुसरुन सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

परंतु, महापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक 31 डिसेंबर 2017 किंवा त्यापुर्वीचा असेल, त्या बाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल, परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत –

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र सादर करील

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल.

( स. अजितपालसिंघ संधु )
नगरसचिव
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

Scanned with CamScanner

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका महापौर निवडणूक सभेची सुचना परिपत्रक

केवळ महानगरपालिका सदस्यांसाठी

जा.क्र. नावाशमनपा/नसका/सिआर-16/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक:- 08.10.2021

परिपत्रक

विषय :- मा. महापौर पदाची निवडणूक-2021

महोदय,

नुकतीच नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक 2017 पार पडलेली असुन त्यानुसार महापौर या पदावर निवड करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर यापदासाठी निवडणूका घेणे) नियम 2005 (सुधारणा) नियम 2006 नियम 3(1) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची विशेष सभा आयोजीत करण्यासाठी सदर (सुधारणा) नियम 2006 चे नियम 3 (2) अन्वये मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक 13/10/2021 रोजी सकाळी 11.00 वाजता निश्चित केली आहे. या विशेष सभेची कार्यक्रम पत्रिका स्वतंत्रपणे आपणाकडे पाठविण्यात येत आहे. त्या सभेत खालील प्रमाणे निवडणूकीचा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. तसेच महापौर, यांचे निवडी संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणूक घेणे) नियम 2005 व (सुधारणा) नियम 2006 अन्वये झालेल्या बदला बाबतची माहिती (शासन अधिसुचनेची प्रत) देखील देण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 19(1) आणि महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणूक घेणे) नियम 2005 व (सुधारणा) नियम 2006 अन्वये महापौर या पदाची निवडणूक या सभेत होईल.

## महापौर निवडी संबंधी कार्यपध्दती

महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणूक घेणे) नियम 2005 व (सुधारणा) नियम 2006 चे तरतुदी अन्वये महापौर, पदाच्या मतदान प्रक्रिया व निवडी संबंधी तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

1. महापौर निवडीसाठी बोलावण्यात आलेली विशेष सभा नियम 3 (3) च्या तरतुदी प्रमाणे रद्द किंवा तहकुब करता येणार नाही.
2. नियम 4(1) प्रमाणे उक्त पदांसाठी निवडणूक लढविण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही निर्वाचीत पालिका सदस्यास नमुना 1 नियम 4(1) या नमुन्यातील नामनिर्देशन पत्र नगरसचिव यांचेकडे नामनिर्देशनसाठी निश्चित केलेल्या तारखेस जातीने सादर करावे लागेल.
3. महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम 2006 चे नियम 4 अन्वये (मूळ नियम 2005 चे नियम 5 मध्ये सुधारणा केल्याप्रमाणे) या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी पिठासीन अधिकारी) मा. विभागीय आयुक्त किंवा त्यांनी नेमलेला प्रतिनिधी असेल.

   या बैठकीसाठी मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील आदेश क्रं. 2021/नपाप्र/आस्था-1/कावि-796 दिनांक 01.10.2021 अन्वये मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना विशेष सभेचे सभाध्यक्ष (पीठासन अधिकारी) म्हणुन प्रधिकृत केलेले आहे.

1- नामनिर्देशन पत्राची छाननी झाल्यानंतर वैध नामनिर्देशन पत्र वाचुन दाखविल्यानंतर मा. पीठासीन अधिकारी हे उमेदवारांचे नांव वर्णानुक्रमाने घोषीत करतील. ज्या उमेदवारांचे नांव पुकारण्यात येईल त्यांचेसाठी प्रथम हात वर करुन मतदान घेण्यात येईल व त्यांना मिळालेल्या मतांची नोंद घेण्यात येईल व त्यांनी ज्या उमेदवारांच्या बाजुने मत दिले आहे अशा पालिका सदस्यांचे नावाची नोंद कार्यवृत्तांत नोंदविण्यात येईल.

2- मत देण्यास इच्छुक असलेल्या निर्वाचीत पालिका सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी मा. पीठासीन अधिकारी देतील.

3- ज्यांचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे अशा निर्वाचीत पालिका सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

4- ज्या निर्वाचीत पालिका सदस्यांनी मतदान केलेले नाही त्याची नोंद कार्यवृत्तांत घेण्यात येईल.

कृपया मागील पान---2---वर पहावे

Scanned with CamScanner

5- मते समसमान मिळाल्यास पीठासीन अधिकारी असे घोषित करील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठया टाकून सोडतीव्दारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले निर्वाचीत पालिका सदस्य बहुसख्यंने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल.

6- ज्या उमेदवारांच्या नावाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रितीने निवडून आला असल्याचे पीठासीन अधिकारी घोषीत करतील.

<u>टिप :-</u> अ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 19(1) अन्वये महापौर यांचा पदावधी अडीच वर्ष इतका होता तथापि श्रीमती येवनकर मोहिनी विजय यांनी दिनांक 30.09.2021 रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे नवनियुक्त महापौरांचा कार्यकाळ दुस-या सत्राच्या उर्वरीत कालावधीसाठी राहील.

ब) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रमांक एमसीओ-2019/प्र.क्र.155/नवि-14 दिनांक 14 नोवहेंबर 2019 अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या **महापौर पद हे नागरीकांचा मागास प्रवर्ग (महिला) करीता आरक्षित ठेवण्यात आलेले आहे.**

**<u>महापौर, पदासाठी नामनिर्देशन पत्रे (नॉमिनेशन पेपर) वितरीत करणे व स्विकारणे ई. कार्यक्रम पुढील प्रमाणे ठेवलेला आहे</u>**

| अ.क्र. | तपशिल / विवरण | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 01 | नामनिर्देशन पत्र वितरित करणे | दिनांक 09.10.2021 रोजी **(सार्वजनिक सुट्टी असलीतरी)** एकच दिवस सकाळी 11.00 ते दुपारी 03.00 पर्यंत नामनिर्देशन पत्र वितरीत करण्यात येईल |
| 02 | नामनिर्देशन पत्र स्विकारणे | दिनांक 09.10.2021 रोजी **(सार्वजनिक सुट्टी असलीतरी)** एकच दिवस दुपारी 03.00 ते सायंकाळी 06.00 वाजे पर्यंत नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येईल. |
| 03 | नामनिर्देशन पत्र स्विकारण्याची अंतीम तारीख व वेळ | दिनांक 09.10.2021 रोजी **(सार्वजनिक सुट्टी असलीतरी)** एकच दिवस दुपारी 03.00 ते सायंकाळी 06.00 वाजे पर्यंत नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येईल. |
| 04 | नामनिर्देशन पत्रे कोणी व कोठे स्विकारावयाचे | नगरसचिव (नगरसचिव कार्यालय) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मुख्य प्रशासकिय इमारतीतील पहिला मजला रुम नं. 118 येथे नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येतील. |
| 05 | नामनिर्देशन पत्राची छाननी | दिनांक 13.10.2021 रोजी विशेष सभा सुरु झाल्यानंतर सभागृहात मा. पीठासीन अधिकारी हे करतील. |
| 06 | उमेदवारी मागे घेणे | दिनांक 13.10.2021 रोजी सभागृहात छाननीनंतर वैध उमेदवाराची नावे मा. पिठासीन अधिकारी यांनी वाचुन दाखविल्यानंतर 15 मिनिटात लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकारी यांना देवुन उमेदवारी मागे घेता येईल. |

1. कोरे नामनिर्देशन पत्राचे नमुने (नॉमिनेशन पेपर) नगरसचिव, नगरसचिव कार्यालय नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रशासकिय इमारतीतील पहिला मजला रुम नं. 118 येथील कार्यालयातुन वर नमुद तारखेस व वेळात मिळतील.
2. नामनिर्देशन पत्रे पुर्ण भरुन वरील तारखेस व वेळात नगरसिचव, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांचेकडे निवडणूक लढविण्यास इच्छुक निर्वाचीत पालिका सदस्यास जातीने दाखल करावे लागेल.
3. महापौर पदासाठी 4 (चार) पेक्षा अधिक नामनिर्देशनपत्र दाखल करता येणार नाहीत.
4. मा. महापौर पदासाठी कोणत्याही पालिका सदस्यास एका पेक्षा अधिक उमेदवाराची नामनिर्देशन पत्रे सुचीत करता येणार नाही किंवा त्यास अनुमोदन देता येणार नाही.

(स. अजितपालसिंघ संधु)
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

Scanned with CamScanner